प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता "अतिरिक्त राज्य हिस्सा (१००%)" या योजनेकरिता रुपये ३९,८६,७३,८००/-एवढा निधी वितरीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२६/प्र.क्र.११६/E-१६२३२६९/योजना-१०**

**बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,**

**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**तारीख:** १२ **ऑगस्ट, २०२६**

**वाचा :**

१) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२५/प्र.क्र.०४/योजना-१० दि.०४.०४.२०२५.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.
३) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र क्र. राव्यक-ग्रागृ/ लेखा (प्रआयो) / राज्य अति.हिस्सा/२०२६/३२२, दिनांक.०७.०४.२०२६.
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीजीटी-२०२६/ प्र.क्र.१०५/ अर्थसंकल्प, दि.२२.०७.२०२६.
५) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२६/प्र.क्र.११६/योजना-१०, दि.०३.०८.२०२५.

**प्रस्तावना :**

"सर्वांसाठी घरे" हे केंद्र शासनाचे धोरण असून, राज्यात केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. त्या नूसार राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजना राबविण्यात येत असून, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर विविध प्रवर्गांकरीता राज्य पुरस्कृत आवास योजना राबविण्यात येत आहेत. सदरील सर्व योजनांची अंमलबजावणी ग्राम विकास विभागांतर्गत स्थापित राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयामार्फत करण्यात येते.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल

लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिस्स्यातून रु. ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यास दिनांक ०४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. यानुषंगाने सदर अनुदानाकरिता अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत एकुण १,६१,३७३ घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्या नूसार सदर आवास योजनांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता "अतिरिक्त राज्य हिस्सा" (२५०५A२२७) या योजनेकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेल्या एकुण रुपये १९९,३३,६९,०००/- (अक्षरी रुपये एकशे नव्व्यान्नव कोटी तेहत्तीस लाख एकोणसत्तर हजार मात्र) तरतुदीपैकी वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झालेला रुपये ३९,८६,७४,०००/-(अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी शहाऐंशी लाख चौऱ्याहत्तर हजार मात्र) इतका निधी वितरीत करणेकरीता संदर्भ क्र. ०५ अन्वये दिनांक ०३.०८.२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला होता. परंतु, वित्त विभागामार्फत २५०५A२२७ लेखाशीर्षातील ३३-अर्थसहाय्य या उद्दिष्टाखाली अर्थसंकल्पित रु. १९९.३३६९ कोटी तरतूदीपैकी २०% म्हणजेच रु. ३९.८६७३८कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असल्याने सदर रु. ३९.८६७३८कोटी इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

वाचा येथे नमुद केलेला संदर्भ क्र.०५ येथिल दि.०३.०८.२०२६ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ तसेच, विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील अनुसूचित जाती प्रवर्गातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांकरीता "अतिरिक्त राज्य हिस्सा" (२५०५A२२७) या योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेल्या तरतुदीतून रुपये ३९,८६,७३,८००/-( अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी शहाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार आठशे मात्र) इतका निधी सदर योजनेकरीता वित्त विभाग, शासन परिपत्रक दि. ०९.०४.२०२६ मधिल अटींच्या पुर्ततेच्या अनुषंगाने वितरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेंतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये "अतिरिक्त राज्य हिस्सा" रक्कम रुपये ३९,८६,७३,८००/-( अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी शहाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार आठशे मात्र) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (B.D.S.) संचालक, राज्य व्यवस्थान कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्याकडे खालील लेखाशिर्ष अंतर्गत वितरीत करण्यात येत आहे.

| सन-२०२६-२७ | | | | | रूपये लाखात |
|---|---|---|---|---|---|
| महिना | लेखाशिर्ष | एकुण अर्थ-संकल्पीत तरतुद | BEAMS वर वितरणास उपलब्ध तरतुद | **क्षेत्रीय यंत्रणेस वितरित करावयाचा निधी** | शिल्लक अर्थ-संकल्पीय तरतुद |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6(3-5) |
| ऑगस्ट -२०२६ | एन-३, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग-<br>२५०५ ग्रामीण रोजगार<br>६० इतर कार्यक्रम<br>७८९ अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>०१ अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (०७) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)<br>(अतिरिक्त राज्य हिस्सा)(कार्यक्रम)<br>**(२५०५A२२७)** | १९९३३.६९ | ३९८६.७३८ | **३९८६.७३८** | १५९४६.९५२ |

४. या शासन निर्णयाव्दारे वितरीत होणारा निधी उपरोक्त लेखाशिर्षासाठी सन २०२६-२७ करीता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा. सदर निधी संबंधित योजनेच्या Single Nodal Agency (SNA) खात्यामध्ये वर्ग करण्यात यावा.

५. प्रस्तुत निधीबाबत उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण-गृहनिर्माण हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून (संकेतांक क्रमांक १२०१००५१८३) तसेच संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण-गृहनिर्माण हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. सदर निधीची देयके ठाणे कोषागार अंतर्गत उपकोषागार कार्यालय कोकण भवन, बेलापूर येथे पारित करण्यात यावीत.

६. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर- १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा देयक क्रमांक व दिनांक, ४) महालेखापाल कार्यालयात नोंद झालेल्या रकमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र, हि माहिती लेखाधिकारी कार्यासन योजना-२, ग्राम विकास विभाग यांना सादर करण्यात यावी.

७. सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची व कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी यांनी दक्षता घेण्यात यावी, अन्यथा वित्तीय अनियमीतता समजण्यात येईल. तसेच, सदरचा निधि विहित कालावधीत खर्च करण्याची खबरदारी

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण-गृहनिर्माण यांनी घ्यावी. वित्त विभाग परिपत्रक दिनांक ०९ एप्रिल,२०२६ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे तसेच परिपत्रकातील मुद्दा क्र.१२ व परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील तपासणी सूचीतील अटींची पूर्तता होत असल्याचा दाखला देण्यात यावा, आणि लाभार्थीच्या खात्यात अनुदान जमा केल्याचा अहवाल दरमहा न चुकता शासनास सादर करण्याची दक्षता कार्यक्रम प्रमुखांनी घ्यावी.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाकडील शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६ अन्वये, केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत निधी वितरणाबाबतच्या अटी व शर्तीनुसार तसेच, विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय क्र.बीजीटी-२०२६/ प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.२२.०७.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१२५२५१९७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHASHIKANT D TIJARE

Digitally signed by SHASHIKANT D TIJARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Department,
2.5.4.20=E1E60B788875C086F4BC546AEFE13773C3D89B2D2497473FC2F335C58C20C42C, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E7125EA0D83A0ACA0212D600BE2759B362F98CA65C0F42D0E6ABB896D8991D46, cn=SHASHIKANT D TIJARE
Date: 2026.08.12 13:41:03 +05'30'

**(श.ज्ञा.तिजारे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायतराज यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
२) मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायतराज यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतींसह)
४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, ४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
६) कोषागार अधिकारी (सहायक संचालक संवर्ग), उपकोषागार कार्यालय, कोकण भवन, बेलापूर.
७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (वि.घ.योजना), मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
८) वित्त विभाग (व्यय-१४ व १५) व (अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९) कार्यासन अधिकारी, वित्त-१, वित्त-७, योजना-२, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
१०) निवड नस्ती योजना-१०.